आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 06/09/2026 METRO CITY VRUTANT

> संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 185 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# हिंजवडीसह सात गावांचा तातडीने महापालिकेत समावेश करा

## खासदार श्रीरंग बारणे यांची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - हिंजवडी आयटी पार्क व परिसरातील गंभीर समस्यांचे तातडीने निराकरण करावे. हिंजवडी, माण, मारुंजी, नेरे, जांभे, सांगवडे व गहुंजे परिसराचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत तातडीने समावेश करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी राज्य शासनाकडे केली आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांना खासदार बारणे यांनी निवेदन दिले आहे.

हिंजवडी आयटी पार्क व परिसरामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून विविध गंभीर समस्या निर्माण झालेल्या असून, या समस्यांमुळे देश-विदेशातील नामांकित आयटी कंपन्यांमध्ये काम करणारे हजारो कर्मचारी, स्थानिक नागरिक तसेच दररोज या परिसरात ये-जा करणाऱ्या लाखो नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

हिंजवडी आयटी पार्कमधील रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडी, अपुरी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, अतिक्रमणे, कचरा व्यवस्थापनाचा अभाव तसेच पायाभूत सुविधांची कमतरता यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

या संदर्भात मी गेल्या वर्षी स्वतः पीएमआरडीए आयुक्त यांच्यासोबत बैठक घेऊन हिंजवडी एमआयडीसी परिसरातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करणे, ज्या-ज्या चौकांमध्ये सातत्याने वाहतूक कोंडी होते. त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार उड्डाणपूल अथवा इतर वाहतूक उपाययोजना करणे, तसेच परिसरातील अतिक्रमणे हटविणे याबाबत सूचना केल्या होत्या. त्यानंतरही या समस्यांवर अपेक्षित स्वरूपात ठोस कार्यवाही झालेली नाही. संबंधित यंत्रणांकडे सातत्याने पत्रव्यवहार करूनही परिस्थितीत लक्षणीय सुधारणा झालेली दिसून येत नसल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

हिंजवडी आयटी पार्कमध्ये देशभरातील मोठ्या आयटी कंपन्या कार्यरत असून, मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. मात्र, पायाभूत सुविधांच्या अभावामुळे या परिसराची ओळख आता वाहतूक कोंडी आणि नागरिकांच्या समस्यांसाठी होत आहे. दररोज सकाळी व सायंकाळी होणाऱ्या प्रचंड वाहतूक कोंडीमुळे कर्मचारी व नागरिकांचा मोठ्या प्रमाणात वेळ वाया जात असून, त्याचा परिणाम उद्योग आणि रोजगाराच्या वातावरणावरही होत असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

### मेट्रो लवकर सुरू करा

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्प हा या परिसरातील वाहतूक समस्येवर महत्त्वाचा उपाय ठरू शकतो. या मार्गाची चाचणी झालेली असतानाही प्रत्यक्ष प्रवासी सेवा अद्याप सुरू झालेली नाही. मेट्रो सेवा तसेच इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम आणि नियमित झाल्यास हिंजवडी आयटी पार्कमधील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे मेट्रो सेवा लवकरात लवकर सुरू करण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देण्यात यावेत.

### सर्व विभागांची संयुक्त बैठक घ्या

हिंजवडी परिसरातील रस्ते, वाहतूक व्यवस्था, अतिक्रमणे, कचरा व्यवस्थापन आणि इतर नागरी सुविधांबाबत पीएमआरडीए, एमआयडीसी, पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महानगरपालिका, वाहतूक पोलीस व संबंधित सर्व विभागांची संयुक्त बैठक घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना निश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. हिंजवडी आयटी पार्कसह हिंजवडी, माण, मारुंजी, नेरे, जांभे, सांगवडे व गहुंजे या झपाट्याने विकसित होत असलेल्या परिसराचा पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत समावेश करण्यात यावा, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 06/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# आमदार महेश लांडगे यांची जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेत नियुक्ती

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या कामकाजाला अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, आमदार महेश लांडगे यांची जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुणे अंतर्गत नियामक परिषदेवर (गव्हर्निंग कौन्सिल) सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा खनिकर्म अधिकारी तथा नियामक परिषदेचे सदस्य सचिव आनंद पाटील यांनी याबाबतचे अधिकृत पत्र दिले आहे.**



महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या 4 ऑगस्ट 2026 रोजीच्या शासन निर्णयानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित सदस्य लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत असेपर्यंत त्यांचा नियामक परिषदेवरील कार्यकाळ कायम राहणार आहे. लोकप्रतिनिधी म्हणून असलेला कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर नियामक परिषदेवरील सदस्यत्व आपोआप संपुष्टात येणार असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या विकासाभिमुख धोरणातून जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून खनिजप्रभावित भागांमध्ये पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत सुविधांच्या विकासाला चालना देण्यावर भर दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांच्यावर नियामक परिषदेच्या सदस्यपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

### खनिजप्रभावित भागांच्या विकासासाठी प्रभावी भूमिका

जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या निधीचा प्रभावी वापर करून खनिजप्रभावित भागांमध्ये विकासकामांना गती देण्याची मोठी जबाबदारी नियामक परिषदेवर असते. आमदार लांडगे यांच्या नियुक्तीमुळे पुणे जिल्ह्यातील अशा भागांच्या विकासाशी संबंधित प्रश्नांना अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. "जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून खनिजप्रभावित भागांमध्ये विकासकामांना गती देणे, नागरिकांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि उपलब्ध निधीचा प्रभावी व पारदर्शक वापर सुनिश्चित करणे, ही आपली प्राथमिकता राहील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारच्या विकासाच्या दृष्टिकोनाला पूरक काम करण्याचा माझा प्रयत्न असेल," असे आमदार महेश लांडगे यांनी सांगितले.

"मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून खनिजप्रभावित भागांमध्ये मूलभूत सुविधा आणि विकासकामांना अधिक गती देण्यासाठी नियामक परिषदेवर मिळालेल्या जबाबदारीचा प्रभावीपणे उपयोग करू. खनिज निधीचा योग्य, पारदर्शक आणि लोकहितासाठी विनियोग होईल, यासाठी कटिबद्ध राहू."

**— महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# आमदार शंकर जगताप यांची जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेवर नियुक्ती

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांची जिल्हा खनिज प्रतिष्ठान (DMF), पुण्याच्या नियामक परिषदेवर पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या खनिकर्म शाखेकडून याबाबतचे अधिकृत नियुक्तिपत्र जारी करण्यात आले आहे.**



महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने 5 ऑगस्ट 2026 रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार तसेच 11 ऑक्टोबर 2024च्या अधिसूचनेतील तरतुदींनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या नियामक परिषदेला खाणकामामुळे बाधित भाग आणि तेथील नागरिकांच्या विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी असते.

परिषदेच्या माध्यमातून वार्षिक कृती आराखडा व अर्थसंकल्प मंजूर करणे, विविध विकासकामांना मान्यता देणे, उपलब्ध निधीचा योग्य व पारदर्शक वापर सुनिश्चित करणे, विकासकामांचा वेळोवेळी आढावा घेणे, तसेच वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षित खात्यांना मंजुरी देणे आदी महत्त्वाची कामे केली जातात.

जिल्हा खनिज अधिकारी तथा सदस्य सचिव आनंद पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने आमदार शंकर जगताप यांना नियुक्तिपत्र दिले आहे.

### खनिजबाधित भागांच्या विकासाला प्राधान्य

"जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुण्याच्या नियामक परिषदेवर पदसिद्ध सदस्य म्हणून मिळालेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणार आहे. खनिजबाधित भागातील नागरिकांच्या मूलभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण संवर्धनासाठी उपलब्ध निधीचा योग्य व पारदर्शक वापर व्हावा, यासाठी प्राधान्याने प्रयत्न करेन," अशी प्रतिक्रिया आमदार शंकर जगताप यांनी दिली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 06/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# चाकणमध्ये रिक्षा स्टँडजवळ तीन पत्तीचा जुगार; तिघांविरुद्ध गुन्हा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

चाकण | प्रतिनिधी : युनूस खतीब : चाकण-तळेगाव चौकातील रिक्षा स्टँडजवळ सार्वजनिक ठिकाणी तीन पत्तीचा जुगार सुरु असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली.

3 सप्टेंबर रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास झालेल्या या कारवाईत अब्दुल सत्तार चांद शेख (वय 48), शाम गंगाराम कुरणे (वय 51) आणि यशवंत विठ्ठल आत्राम (वय 40) यांच्याविरुद्ध चाकण उत्तर पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायदा कलम 12(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी तीन पत्तीचा जुगार खेळवत असताना पोलिसांना आढळून आले. त्यांच्याकडून 3 हजार 80 रुपयांची रोकड जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

# ताथवडीत एमडीसह दोघे जेरबंद 4.62 लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

ताथवडे | प्रतिनिधी : युनूस खतीब : विक्रीसाठी मेफेड्रॉन (एमडी) बाळगणाऱ्या दोघांना हिंजवडी पोलिसांनी ताथवडे येथे अटक केली. आरोपींकडून 9 ग्रॅम एमडीसह 4 लाख 62 हजार 600 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. 4 सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास निटॉन आरएमसी प्लांटजवळ, बापुजी बुवा नगर परिसरात ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी ताबान झायार पठाण (वय 30) आणि काशीफ परवेज मुजावर (वय 21) यांच्याविरुद्ध हिंजवडी पोलीस ठाण्यात एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी आरोपींकडून 9 ग्रॅम मेफेड्रॉन (एमडी), दोन मोबाईल, एक चारचाकी कार आणि रोकड, असा एकूण 4,62,600 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक माळ करीत आहेत

# मोशीमध्ये एमडी-अफीमची तस्करी; दोघे जेरबंद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मोशी | प्रतिनिधी : युनूस खतीब : विक्रीसाठी एमडी आणि अफीमची वाहतूक करणाऱ्या दोघांना अंमली पदार्थ विरोधी पथकाने मोशी येथे अटक केली. त्यांच्याकडून अंमली पदार्थांसह 4 लाख 30 हजार 25 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. 3 सप्टेंबर रोजी सायंकाळी प्रियदर्शनी शाळेसमोर, देहू-मोशी रोडवरील महालक्ष्मी फर्निचर दुकानासमोर, बोराटेवस्ती येथे ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी आकाश कुमार भेराराम बिश्नोई (वय 21) आणि प्रविण कुमार हिराराम बिश्नोई (वय 18) यांच्याविरुद्ध एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपींकडून एमडी व अफीम, दोन मोबाईल, डिजिटल वजनकाटा आणि दुचाकी असा मुद्देमाल जप्त केला. चौकशीत एमडी राजस्थानातून प्रविणकडून विक्रीसाठी आणल्याचे, तर अफीम कमलेश बिश्नोई याच्याकडून आणल्याचे आरोपींनी सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जोनापल्ले करीत आहेत.

# चऱ्होलीत मोकाट कुत्र्यांचा वृद्धांवर हल्ला; दोघे जखमी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

चऱ्होली | प्रतिनिधी : युनूस खतीब : सोसायटीमध्ये पाळलेले कुत्रे मोकाट सोडल्याने त्यांनी दोन ज्येष्ठ नागरिकांना चावा घेऊन जखमी केल्याची घटना चऱ्होलीतील जेनेसिस सोसायटी, वडमुखवाडी येथे घडली. याप्रकरणी प्रकाश केशव पवार (वय 70) यांनी दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार कुत्र्यांचा मालक विक्रम रामस्वरूप बक्षी (वय 58) याच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम 291, 125, 125(ए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 3 सप्टेंबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास आरोपीने कुत्र्यांची योग्य काळजी न घेता त्यांना सोसायटीत मोकळे सोडल्याचा आरोप आहे.

या कुत्र्यांनी फिर्यादी प्रकाश पवार तसेच नसिब नारायण ठाकूर (वय 67) यांना चावा घेऊन जखमी केले. कुत्र्यांमुळे रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, याची पूर्वकल्पना असूनही निष्काळजीपणा केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

आरोपी अद्याप अटक झालेला नाही. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कटपाळे करीत आहेत.

SUNSHINE GRAPHICS & WEB DEVELOPMENT
संपर्क: 8379928399
आपल्या न्यूज चॅनल साठी बनवा
प्रोफेशनल न्यूज पोर्टल वेबसाईट
आम्ही देतोय संपूर्ण डिजिटल सोल्यूशन एकाच ठिकाणी!

योग्य दरात
सोशल मिडिया डिझाईन
न्यूजपेपर डिझाईन
डिजिटल न्युज प्रिंट
व्हिजिटिंग कार्ड
लोगो डिझाईन
फ्लेक्स
इनविटेशन व्हिडिओ

# प्रश्न विचारणाऱ्या आवाजाला लगाम नको, पण भाषेलाही लगाम हवा!

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुण्याच्या सोशल मीडिया विश्वात संतोष पंडित हे नाव गेल्या काही वर्षांत विशेष चर्चेत आले आहे. महापालिका प्रशासन असो, रस्त्यांवरील खड्डे असोत, वाहतुकीचे प्रश्न असोत किंवा लोकप्रतिनिधींच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे मुद्दे असोत—पंडित यांनी आपल्या रील्स आणि व्हिडीओच्या माध्यमातून हे प्रश्न सातत्याने जनतेसमोर आणले. पुणे शहरातील सामान्य नागरिकांच्या रोजच्या जगण्याशी संबंधित प्रश्नांना सोशल मीडियाच्या माध्यमातून वाचा फोडण्याचा त्यांचा प्रयत्न नाकारता येणार नाही.**




मात्र, आज संतोष पंडित यांचे नाव एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आले आहे. कथित आक्षेपार्ह आणि अश्लील भाषेचा वापर केल्याच्या तक्रारीवरुन त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आणि 3 सप्टेंबर रोजी पहाटे सुमारे एकच्या सुमारास त्यांना पोलिसांनी अटक केली. या कारवाईनंतर पुण्यात एकच प्रश्न उपस्थित झाला—प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीला अटक झाली की प्रश्न विचारण्याच्या पद्धतीवर कारवाई झाली?

**या दोन्ही गोष्टी वेगळ्या आहेत आणि त्यातील फरक समजून घेणे आज अत्यंत आवश्यक आहे.**

लोकशाहीमध्ये सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही. उलट, सत्तेत असणाऱ्यांना प्रश्न विचारले जाणे ही लोकशाहीच्या आरोग्याची खूण आहे. मंत्री असो, आमदार असो किंवा प्रशासनातील अधिकारी—जनतेच्या पैशातून होणाऱ्या कामांचा जाब जनतेला विचारण्याचा अधिकार आहे. रस्त्यावर खड्डे का पडले? कामाचा दर्जा काय? निधी कुठे खर्च झाला? वाहतूक व्यवस्था का कोलमडली? विकासकामे वेळेत का पूर्ण होत नाहीत? या प्रश्नांची उत्तरे मागणे हे लोकशाहीतील नागरिकांचे कर्तव्यच आहे.

संतोष पंडित यांनी याच प्रकारचे अनेक प्रश्न आपल्या व्हिडीओच्या माध्यमातून उपस्थित केले आहेत. पुण्यातील रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत त्यांनी वारंवार रील्स केल्या. प्रशासनाकडून डांबर उपलब्ध नसल्याचे कारण सांगितले गेल्याचेही त्यांच्या संदर्भातील चर्चेत समोर आले. त्यानंतर रस्ते दुरुस्तीची कामे सुरु झाल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी पुन्हा व्हिडीओ तयार केला. त्यांच्या कामाची ही बाजू निश्चितच चर्चेची आहे.

**पण याच ठिकाणी एक महत्त्वाचा 'पण' उभा राहतो.**

प्रश्न योग्य असला तरी भाषा चुकीची असेल, तर प्रश्नाची ताकद कमी होते.

संतोष पंडित यांच्या प्रकरणात आरोप नेमका हाच आहे. उपलब्ध वृत्तांनुसार, मंत्री चंद्रकांत पाटील आणि मिताली साळवेकर यांच्याशी संबंधित व्हिडीओमध्ये आक्षेपार्ह आणि अश्लील भाषा वापरल्याची तक्रार करण्यात आली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आणि पुढे अटक केली.

म्हणूनच या प्रकरणाकडे केवळ 'सरकारविरोधात बोलणाऱ्याला अटक' किंवा 'सरकारवर टीका करणाऱ्याला धडा' अशा एका बाजूच्या चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही.

**कारण अभिव्यक्तिस्वातंत्र्याला जबाबदारीची जोड असते.**

सत्ताधाऱ्यांवर टीका करा. प्रशासनाच्या चुका दाखवा. भ्रष्टाचाराचा संशय असेल तर प्रश्न विचारा. विकासकामांतील त्रुटी जनतेसमोर आणा. लोकप्रतिनिधींच्या कामाचा हिशेब मागा. पण व्यक्तीवर टीका करताना तिच्या कुटुंबाचा, खासगी आयुष्याचा किंवा विशेषतः महिलांच्या प्रतिष्ठेचा अवमान करणारी भाषा वापरण्याची गरज काय?

शब्द हे शस्त्र आहेत; पण लोकशाहीतील पत्रकारिता आणि सामाजिक चळवळीची खरी ताकद शिव्यांमध्ये नसते, तर पुराव्यांमध्ये असते.

संतोष पंडित यांच्या रील्सचा प्रभाव मोठा असेल, तर त्यांच्याकडून अपेक्षाही मोठ्या आहेत. हजारो लोक एखादा व्हिडीओ पाहत असतील, तर त्या शब्दांचा परिणामही तितकाच व्यापक असतो. त्यामुळे सामान्य नागरिकाचा आवाज बनू इच्छिणाऱ्या व्यक्तीने स्वतःच्या भाषेची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.

त्याच वेळी दुसरा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे—कायद्याचा वापर समान निकषांनी होतो आहे का?

एखाद्या सामान्य नागरिकाने चुकीची किंवा आक्षेपार्ह भाषा वापरली तर कायदा लागू झाला पाहिजे; तसेच सत्ताधारी व्यक्तीविरोधात बोलताना कायदा अधिक कठोर आणि सत्ताधाऱ्यांच्या बाजूने झुकणारा दिसता कामा नये. लोकशाहीमध्ये कायद्याची प्रतिष्ठा तेव्हाच टिकते जेव्हा तो सत्ताधारी आणि सामान्य नागरिक—दोघांसाठी समान असतो.

म्हणूनच संतोष पंडित यांच्या अटकेकडे पाहताना दोन गोष्टी स्पष्टपणे सांगाव्या लागतील.

पहिली—प्रश्न विचारण्याचा अधिकार अबाधित राहिला पाहिजे.

दुसरी—प्रश्न विचारताना सभ्यतेची आणि कायद्याची चौकट ओलांडता कामा नये.

गोपीचंद पडळकर यांच्या वाहनाच्या नंबर प्लेटपासून ते चंद्रकांत पाटील यांच्यावरील टीकेपर्यंत पंडित यांच्या सोशल मीडिया पोस्टमुळे राजकीय चर्चेला उधाण आले. हीच बाब दाखवते की सोशल मीडिया आता केवळ मनोरंजनाचे माध्यम राहिलेले नाही. तो जनमत घडवणारा आणि सत्तेला प्रश्न विचारणारा प्रभावी मंच बनला आहे.

म्हणून सोशल मीडिया कार्यकर्त्यांनाही नव्या काळाची नवी जबाबदारी स्वीकारावी लागेल.

व्हायरल होणे हे उद्दिष्ट नसावे; प्रश्न व्हायरल झाला पाहिजे.

शिवी व्हायरल होण्यापेक्षा सत्य व्हायरल झाले पाहिजे.

व्यक्तीचा अपमान करण्यापेक्षा व्यवस्थेतील दोष उघड झाले पाहिजेत.

आणि प्रशासनानेही हे लक्षात ठेवले पाहिजे की एखाद्या रीलमुळे प्रश्न उपस्थित झाला म्हणून प्रश्न विचारणाऱ्याला शत्रू समजणे ही लोकशाहीची पद्धत नाही. चुकीचे आरोप असतील तर तथ्यांसह उत्तर द्या. काम योग्य असेल तर त्याची माहिती जनतेला द्या. टीका चुकीची असेल तर कायदेशीर मार्ग उपलब्ध आहेत.

संतोष पंडित यांच्यावर कायदेशीर आरोप झाले आहेत; त्याचा अंतिम निर्णय न्यायालयीन प्रक्रियेत होईल. परंतु या संपूर्ण प्रकरणातून समाजाने आणि सोशल मीडिया क्षेत्राने एक मोठा धडा घेण्याची गरज आहे.

लोकशाहीला संतोष पंडितांसारख्या प्रश्न विचारणाऱ्या आवाजांची गरज आहे; पण त्याच लोकशाहीला संयमी, पुराव्याधारित आणि सुसंस्कृत भाषेचीही गरज आहे.

संतोष पंडित यांनी समाजहिताचे प्रश्न मांडण्याचे काम थांबवू नये. उलट ते अधिक ताकदीने करावे. मात्र, पुढच्या वेळी त्यांच्या रीलची चर्चा झाली तर ती 'किती शिवराळ भाषा वापरली?' यासाठी नव्हे, तर 'किती मोठा प्रश्न जनतेसमोर आणला?' यासाठी व्हावी.

कारण सत्तेला प्रश्न विचारणारा आवाज महत्त्वाचा असतो; पण त्या आवाजाची विश्वासार्हता त्याच्या शब्दांपेक्षा सत्यात असते.

प्रश्न विचारा... आक्रमकपणे विचारा... पण शब्दांची मर्यादा सांभाळून विचारा.

कारण लोकशाहीत आवाज दाबला जाऊ नये, आणि आवाजाने कुणाची प्रतिष्ठाही तुडवली जाऊ नये—हीच खरी लोकशाहीची कसोटी आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968